



परळी संघर्षनेता

समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...

https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे






बीड | वर्षे- 11 वे | अंक क्र 169 | रविवार दि. 12 जुलै 2026 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060


# ‘तर आम्ही तुम्हाला जनतेसमोर उघडे पाडू’, सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारला सुनावलं

सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारवर तीव्र नाराजी व्यक्त करत, तुम्हाला जनतेसमोर उघडे पाडू असा कठोर इशारा दिला आहे. न्यायालयाने म्हटले की, राज्य सरकार जामीन अर्जांना जोरदार विरोध करते, मात्र फौजदारी खटल्यांची सुनावणी जलदगतीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलत नाही. न्यायमूर्ती अहसानुद्दीन अमानुल्लाह आणि न्यायमूर्ती शील नागू यांच्या खंडपीठासमोर एका परदेशी नागरिकाच्या जामीन अर्जावर सुनावणी सुरु होती. त्यावेळी न्यायालयाने हे विधान केले आहे.सुप्रीम कोर्टाने सुनावणीदरम्यान म्हटले, ‘महाराष्ट्रातील अशा प्रकारची प्रकरणे दररोज येत आहेत. तुम्ही जामीनाला जोरदार विरोध करता, पण खटल्यांची सुनावणी वेगाने होण्यासाठी कोणतीही प्रभावी पावले उचलत नाही. जेव्हा आम्ही प्रकरणाची तपासणी करतो, तेव्हा पुरावे कमकुवत असल्याचे दिसते. त्यामुळे आम्ही तुम्हाला



जनतेसमोर उघडे पाडू.’अपहरण आणि खून प्रकरणातील एका आरोपीने न्यायालयाला सांगितले की, तो गेली चार वर्षे तुरुंगात असून त्याचा खटला ट्रायल कोर्टात 86 वेळा लिस्टेड झाला होता. त्याने सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की, त्याला 53 वेळा न्यायालयातच हजर करण्यात आले नाही. यावर सर्वोच्च न्यायालयाने ही बाब महाराष्ट्र सरकारची गंभीर चूक असल्याचे म्हटले आहे.आरोपीला जलदगतीने खटल्याची सुनावणी मिळणे हा त्याचा मूलभूत अधिकार असल्याचा उल्लेख करत खंडपीठाने म्हटले, ‘आम्हाला याची लाज वाटते. चार वर्षांत 34 साक्षीदारांपैकी केवळ दोन जणांचीच साक्ष नोंदवली गेली आहे. ही बाब काही काळापासून न्यायालयाला अस्वस्थ करत आहे. राज्य सरकार जामीन अर्जांना विरोध करत असेल, तर खटल्याची सुनावणी सुरळीत आणि वेगाने पार पाडण्याची जबाबदारीही त्यांचीच आहे. मात्र प्रत्यक्षात तसे होताना दिसत नाही.’महाराष्ट्र सरकारच्या वतीने हजर असलेल्या वकिलांनी न्यायालयाला सांगितले की, आता राज्य सरकार प्रत्येक सुनावणीच्या दिवशी सर्व आरोपींना ट्रायल कोर्टात हजर करत आहे. सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्यांना फौजदारी खटल्यांची सुनावणी जलदगतीने पूर्ण करण्यासाठी ठोस धोरण तयार करण्याची गरज असल्याचे नमूद केले. न्यायालयाने निर्देश दिले की, दर आठवड्याला किमान चार साक्षीदारांची साक्ष नोंदवावी आणि त्याची नोंद ट्रायल कोर्टासमोर सादर करावी. भविष्यात अशा प्रकारची प्रकरणे समोर

पान 3 वर

# केंद्रीय मंत्रिमंडळात जाणार का? CM फडणवीसांनी एकाच वाक्यात विषय संपवला



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे केंद्रात जातील, तर महाराष्ट्रात चंद्रशेखर बावनकुळे यांना जबाबदारी मिळेल, असा दावा संजय राऊतांनी केलाय. देवेंद्र फडणवीसांची केंद्रात वर्णी लागल्यास मुख्यमंत्रिपदी एकनाथ शिंदे यांना संधी मिळावी, अशी इच्छा शिवसेनेचे नेते व्यक्त करत आहेत. देवेंद्र फडणवीस यांची दिल्लीत वर्णी लागण्याच्या चर्चेने राज्यातील राजकीय वातावरण ढवळून निघालं आहे. आता या चर्चेवर खुद्द मुख्यमंत्री फडणवीसांनीच पहिली प्रतिक्रिया दिली आहे. मी परवाच दिल्लीला गेलो होतो, असं म्हणत मुख्यमंत्री फडणवीसांनी केंद्रात जाण्याची चर्चा फेटाळून लावली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नागपूर

पान 3 वर

# आज ठळक

## पार्थ पवारांचं लग्न ठरलं, दादांच्या घरी पुन्हा एकदा शुभमंगल सावधान



राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या घरात पुन्हा सनई चौघडे वाजणार आहेत. सुनेत्रा पवार यांचे ज्येष्ठ सुपूत्र पार्थ पवार यांचं लग्न ठरलं आहे. त्याआधी त्यांचा साखरपुडा होणार असल्याची बातमी आहे. कायनात धार यांच्याशी पार्थ पवार यांचा साखरपुडा होणार आहे. कायनात धार आणि पार्थ पवार हे दोघेही सुप्रिया सुळे यांची मुलगी रेवतीच्या लग्नात एकत्र दिसले होते. कायनात धार या सध्या दिल्लीमध्ये कार्यरत आहेत.पार्थ पवार आणि कायनात धार यांचा साखरपुडा 29 जुलैला पुण्यात होणार असल्याची माहिती आहे. मुंबईत फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये सुप्रिया सुळे यांची मुलगी रेवतीचं लग्न झालं. त्यावेळी पार्थ पवारांसह कायनात धार दिसल्या होत्या. तेव्हापासूनच दोघांच्या नात्याबद्दल आणि कायनात धार कोण अशी चर्चा सुरु झालेली. अखेर आज त्याचं उत्तर मिळालं आहे. कायनात धार या पार्थ पवारांच्या भावी पत्नी आहेत.कायनात धार फक्त सुखाच्या क्षणातच नाही, तर दुःखद प्रसंगातही पार्थ पवार यांच्यासोबत उभ्या होत्या. अजितदादांच्या निधनानंतर त्यांनी बारामतीत येऊन पवार कुटुंबाच सांत्वन केलं होतं. त्याशिवाय वरळी येथे आयोजित शोकसभेला सुद्धा उपस्थित

पान 3 वर

## ढग होणार गायब, पुन्हा पाऊस कधी पडणार, पंजाबराव डख यांचा मोठा इशारा



काही दिवसांपूर्वी राज्यात झालेल्या पावसामुळे सगळी दाणादाण उडाली. अनेक ठिकाणी पावासाने थैमान घातले. मुंबई, पुणे, नाशिक, ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यात तर अतिवृष्टी झाली. लोकांच्या घरात पाणी शिरले. आता पावसाने थोडी उसंत घेतली आहे. त्यामुळे भविष्यात पाऊस नेमका कधी होईल, असे विचारले जात आहे. याबाबत हवामानाची माहिती देणारे पंजाब डख यांनी सविस्तर सांगितले आहे. पाऊस नेमका कुठे आणि कोणत्या जिल्ह्यात होईल, याबाबत त्यांनी भाष्य केले आहे. पंजाबराव डख यांनी दिलेल्या माहितीनुसार राज्यामध्ये आता 11 ते 14 जुलैपर्यंत सूर्यदर्शन होणार आहे. वारा सुटेल. त्यानंतर 16 जुलैपासून पावसाला सुरुवात होणार आहे. 16 जुलैपासून 19 जुलैच्या काळात राज्यात तुरळक ठिकाणी पाऊस होईल. हा पाऊस विखुरलेल्या स्वरुपात असेल.चार दिवस पाऊस थांबेल. नंतर 16 जुलैनंतर पाऊस पुन्हा सुरु होईल. राज्यात पुन्हा 21 जुलैपासून ते 5 ऑगस्टपर्यंत चांगला आणि जोराचा पाऊस होईल. हा पाऊस राज्यातील वेगवेगळ्या भागात हा पाऊस असेल. 21 जुलैच्या नंतर सर्वाधिक पाऊस विदर्भात असेल. यात 21 जुलै ते 24 जुलैपर्यंत नागपूर, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, वयतमाळ, अकोला, हिंगोली, वाशिम, बुलढाणा, जालना, जळगाव या जिल्ह्यात

पान 3 वर

# ‘आम्हाला फक्त मनसेमध्ये पाठवायचं बाकी राहिलं’, सुप्रिया सुळेंचा पक्षांतराच्या चर्चांवरून संताप;

राज्याच्या राजकारणात मागील काही दिवसांपासून अनेक राजकीय घडामोडी घडताना पाहायला मिळत आहेत. यातच राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या काँग्रेसमध्ये विलिनीकरणाच्या चर्चांना उधाण आलं आहे. यावरुन अनेक दावे-प्रतिदावे केले जात आहेत. यावर काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार), शिवसेना (उबाठा) आणि भाजपा नेत्यांनीही वेगवेगळ्या प्रतिक्रिया दिल्या.



राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या खासदारांबाबतही वेगवेळे दावे-प्रतिदावे केले जात आहेत. त्यामुळे सातत्याने रंगणाऱ्या पक्षांतराच्या चर्चांवरुन आता खासदार सुप्रिया सुळे यांनी संताप व्यक्त केला आहे. ‘आम्हाला आता फक्त मनसेमध्ये पाठवायचं बाकी राहिलं आहे’, असं सुप्रिया सुळे यांनी एका कार्यक्रमात बोलताना म्हटलं आहे. आमचा 8 खासदारांचा व्हॉट्सॲप ग्रुप आहे. आम्हाला रोज टीव्हीवर एका नवीन पक्षात पाठवलं जात आहे. आम्ही त्या ग्रुपवर गंमतीने बोलत असतो. आमच्या ग्रुपमध्ये मी एक जोक पाठवला. कारण आम्हाला 8 जणांना दररोज एका वेगळ्या पक्षात पाठवतात. कधी काँग्रेसमध्ये, कधी

पान 3 वर

# शरद पवारांकडून महायुती सरकारच्या ‘त्या’ निर्णयाचं कौतुक

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीतील अटीशर्तीबाबत मोठी घोषणा केली. ज्या शेतकऱ्यांनी महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेला होता, त्या शेतकऱ्यांचं 50 हजारांऐवजी आता 2 लाखांपर्यंतचं कर्ज माफ होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा



दिलासा मिळणार आहे.

राज्य सरकारने घेतलेल्या या निर्णयाचं शरद पवारांनी देखील कौतुक केलं आहे.

पान 3 वर

# पूर्वीच्या मॅपिंग बरोबरच सध्याचे मॅपिंगही अतिशय महत्त्वाचे, “गणना प्रपत्र” भरणे आवश्यक

## SIR ला हलक्यात घेऊन नका, मॅपिंग नाही केले तर शासकीय सवलती होणार बंद - प्रा. पवन मुंडे

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) निवडणूक आयोगाकडून एसआयआर (विशेष सखोल पुनरिक्षण) नोंदणी चालू आहे. पूर्वी झालेली मॅपिंग ही ONLINE PREE SIR मॅपिंग होती त्या मध्ये फक्त 2002 व 2024 यादीतील नावांची जुळवणी केली गेली तर आताची मॅपिंग ही निवडणूक आयोगाची मुख्य मॅपिंग प्रक्रिया आहे. त्यामुळे SIR ला हलक्यात घेऊन नका, मॅपिंग नाही केले तर शासकीय सवलती बंद तर होतीलच पण मतदान यादीतून कायमचे नाव कमी होऊ शकते त्यामुळे प्रत्येक वार्डावार्डात आपल्या बीएलओला भेटून एसआयआर प्रक्रिया पूर्ण करुन घेणे महत्वाचे आहे. प्रत्येकाने आपले व आपल्या कुटुंबातील व्यक्तींचे “गणना प्रपत्र” भरणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्येकाने काळजीने या कार्यात सहभागी व्हावे असे आवाहन परळी नगरपरिषदेचे बांधकाम सभापती,भाजपाचे गटनेते तथा भाजपाचे BLA- 1 परळी विधानसभा प्रमुख प्रा. पवन मुंडे यांनी केले आहे.

राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे व मा. खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या सूचनेनुसार SIR प्रक्रिये साठी परळी विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते कामाला लागले आहेत. पूर्वीचे मॅपिंग प्रक्रिया ही ONLINE PREE SIR मॅपिंग होती मात्र त्या मॅपिंग प्रमाणेच आताही स्वतः सहित संपूर्ण कुटुंबाचे “गणना प्रपत्र” भरुन देत मॅपिंग करणे गरजेचे आहे. नागरिकांनी या राष्ट्रीय प्रक्रियेत सहभागी होऊन एसआयआर प्रक्रिया पूर्ण करुन घेणे आवश्यक आहे. जे नागरिक SIR मॅपिंग करणार नाहीत त्यांची नावे मतदान यादीतून उडतील आणि त्यांना कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ मिळणार नाही.सध्या परळी मतदारसंघात सर्वत्र सरकारी BLO आणि भाजपचे BLA 2 घरोघरी जाऊन मतदारांचे

पान 3 वर



# शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करून सातबारा कोरा करा

## अखिल भारतीय किसान सभेची माजलगाव येथे निदर्शने



माजलगाव प्रतिनिधी : दि. 10 जुलै 2026अखिल भारतीय किसान सभा, महाराष्ट्र राज्य कमिटीच्या वतीने राज्य सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफीतील जाचक अटी रद्द कराव्यात आणि शेतकऱ्यांचा सातबारा खऱ्या अर्थाने कोरा करावा, या मागणीसाठी आज माजलगाव येथील तहसील कार्यालयासमोर

पान 3 वर

# इनरव्हील क्लब परळीच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदभार स्वीकार समारंभ

## वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा दिला संदेश



परळी/प्रतिनिधी

इनरव्हील क्लब, परळीच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदभार स्वीकार समारंभ शुक्रवारी स्वातीनगर येथील धुमाळ यांच्या अनंतकुंज निवासस्थानात उत्साहात पार पडला. यावेळी नूतन अध्यक्षा आशा उत्तम धुमाळ यांनी मावळत्या अध्यक्षा ॲड. शुभांगी गित्ते यांच्याकडून अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला.ॲड.गित्ते यांनी आशा धुमाळ यांना चार्टर पिन प्रदान करून पदभार सुपूर्द केला.

यावेळी उपाध्यक्षा उमा समशेट्टी, सचिव शैलजा बाहेती, आयएसओ तारा अग्रवाल,

पान 3 वर

# शिक्षण सभापती योगेश मेनकुदळे यांची नवीन प्राथमिक शाळेला भेट;

## » शाळेच्या दुरुस्तीचे आश्वासन



परळी प्रतिनिधी :नगर परिषद परळी वैजनाथच्या अंतर्गत असलेल्या नवीन प्राथमिक शाळेची इमारत सन 1985 मध्ये बांधण्यात आली होती. या शाळेतून अनेक विद्यार्थी घडले असून आजही मोठ्या संख्येने विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मात्र, कालांतराने शाळेच्या इमारतीची मोठ्या प्रमाणात पडझड झाली आहे. कार्यालय, वर्गखोल्या, व्हरांडा तसेच स्वच्छतागृह व स्नानगृह यांची अवस्था अत्यंत जीर्ण झाली असून तातडीने दुरुस्तीची आवश्यकता निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर नगर परिषद परळी वैजनाथचे शिक्षण सभापती योगेश मेणकुदळे यांनी नवीन प्राथमिक शाळेला भेट देऊन इमारतीची पाहणी केली. यावेळी त्यांनी मुख्याध्यापक व शिक्षकांशी संवाद साधून शाळेतील विविध अडचणी आणि समस्या जाणून घेतल्या.

पान 3 वर

# बंजारा समाज एकता यात्रा रविवारी परळीत

## संत सेवालाल महाराज चौकात होणार स्वागत-अमर पवार



परळी(प्रतिनिधी) धर्मगुरु बाबुसिंग महाराज पोहराड गड तसेच धर्माधिकारी आंध्र प्रदेशचे संत सेवालाल महाराज चॅरिटेबल ट्रस्ट सेवागड श्री जी महाराज यांनी आयोजित केलेली बंजारा समाज एकता संकल्प यात्रा रविवार दि.12 जुलै रोजी परळीत येत असुन संत सेवालाल महाराज चौकात या यात्रेचे भव्य स्वागत केले जाणार

पान 3 वर

# रमाबाई आंबेडकर नगर हत्याकांड विरोधी संघर्षाची 29 वर्ष.-

**अॅड.समीर पठाण**

मुंबई मधील घाटकोपर येथील रमाबाई आंबेडकर नगर, येथे दिनांक 11 जुलै 1997 रोजीच्या भल्या पहाटे महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याची विटंबना झाल्याची घटना समोर आली. बाबासाहेबांचा पुतळा हा भर चौकामध्ये होता.पुतळ्याच्या पाठीमागे अगदी हाकेच्या अंतरावर व नजरे समोर फक्त 20 ते 25 फुट मागे पोलीस चौकी होती चौकीमध्ये पोलीस हजर असताना देखील एकाही पोलिसाने पुतळ्याची विटंबना कोणी केली हे पाहिले नाही? पुतळा विटंबनेची बातमी संपूर्ण रमाबाई आंबेडकर नगरमध्ये वाऱ्यासारखी पसरली. बातमी कळताच वस्ती मधील व परिसरातील लोक पुतळ्याभोवती जमा झाले महामानवाप्रती प्रेम व. आदर असणाऱ्या जनतेत त्यांच्या पुतळा विटंबनेनंतर दुखः, चीड, आक्रोश निर्माण होऊन भावनांचा उद्रेक होणे साहजिक होते. पोलीस अधिकारी कर्मचारी घटना स्थळी हजर झालेले होते. विटंबना करणाऱ्या समाजकंटक कुत्र्यांचा शोध घेन्यासाठी डॉग स्कॉड मागवण्यात यावे, विटंबना करणाऱ्याला ताबडतोब अटक करण्यात यावी. अशा मागण्या जमलेल्या संतप्त जनतेमधुन होऊ लागल्या. पुतळ्या समोरील महामार्गावर प्रचंड लोक पुतळा विटंबना निषेधार्थ रस्त्यावरच ठाण मांडून बसले. संपूर्ण वाहतूक ठप्प झाली होती. सगळीकडे आक्रोश,घोषणा,निषेध,चिड, गोंगाट होता इतक्यात धाड़ धाड़ असा गोळीबाराचा आवाज झाला. आणि सर्व काही शांत झाले. निमलष्करी सशस्त्र असणारे जवान खाडखाड बूट वाजवीत आले. त्यांनी बाबासाहेबांच्या पुतळ्याला घेराव घातला व एका पोलीस अधिकाऱ्याने काठीने पुतळ्याच्या गळ्यातील चपलांचा हार काढुन घेतला. त्यानंतर रमाबाई आंबेडकर नगर वस्तीमध्ये एकच आक्रोश व आकांत पहायला मिळत होता.फौजदार मनोहर कदमच्या आदेशावरुन लोकशाही मार्गाने व शांततेत आंदोलन करणाऱ्या आंदोलनकर्त्यांवर अचानक गोळीबार करण्यात आला.त्या गोळीबारात निरपराध असणाऱ्या दहा जणांचे मुडदे जागच्या जागी पाडण्यात आले. या घटनेत अनेक जन जखमी झाले होते. वस्तीतील जनतेला मोठा धक्का बसला होता. रमाबाई आंबेडकरनगरची संपूर्ण वस्ती रक्ताने लालेलाल झाली होती. या राजकीय षडयंत्राने रचलेल्या हत्याकांडाने उभ्या महाराष्ट्रात असंतोषाचा आगडोंब उफाळून बाहेर आला होता. निरपराध असणाऱ्या दलितांच्या अमांनुष हत्याकांडानंतर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी जातीयवादी फौजदार मनोहर कदमची जाहीरपणे प्रशंसा करुन त्याला पाठबळ दिले, या हत्याकांडाचे सारे पुरावे नष्ट करण्याचा खुप प्रयत्न सुरु होता.

डॉ.बाबासाहेब आंबडेकर यांच्यावर प्रेम करणाऱ्या व त्यांचा आदर करणाऱ्या ज्या कार्यकर्त्यांनी वस्तीमध्ये बाबासाहेबांचा पुतळा स्थापन केला होता त्याच लोकांना पुतळा विटंबनेच्या गुन्ह्यात गोउन आरोपी करण्यात आले. त्यांच्यावर दंगलीचे आरोप करून गुन्हे दाखल केले गेले. गोळीबारात जे वाचले त्यांच्यावरच पोलिसांवर हल्ला केल्याच्या केसेस दाखल केल्या गेल्या. मुंबईतील एका लढाऊ वस्तीला अद्दल घडवण्यासाठी सरकारी यंत्रणेचा वापर करून पाताळयंत्रीपणाचे सारे प्रयोग केले. परंतु आंबेडकरी जनतेने या अत्याचाराचा, दडपशाहीचा प्रतिकार करण्याचे ठरवले. त्यावेळी एक लंढाऊ व्यक्तिमत्व असणारे मा. श्यामदादा गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली रमाबाई आंबेडकर नगर हत्याकांड विरोधी संघर्ष समिती स्थापन करण्यात आली.

श्याम दादांच्या नेतृत्वाखाली या समितीने सातत्याने केलेल्या सरकार ते न्यायालया पर्यंतच्या पाठपुराव्यामुळे व जनतेच्या जनरेट्यामुळे न्या. गुंडेवार चौकशी आयोग सरकारतर्फे नेमला गेला. एकीकडे न्यायालयीन लढा तर दुसरीकडे रस्त्यावर न्यायासाठी आंदोलने सुरु होती. जोशी मुंडे दोनो गुंडे, जातीयवादी शासन चले जाओ, जयभीम के नाम पे खून बहे तो बहणे दो अशा घोषणांनी साऱ्या मुंबई महानगरासह संपूर्ण महाराष्ट्र दणाणून गेला होता त्यावेळी समाजातील निष्क्रिय नेत्यांना रमाबाई आंबेडकर नगर मधील स्वाभिमानी जनतेने मजबूत व जोरदार चोप देऊन वस्तीतुन बाहेर हाकलून दिले होते. त्यानंतर गुंडेवार आयोगातर्फे चौकशी करण्यात आली परंतु अहवाल समोर येत नव्हता. किंबहुना तो येऊ दिला जात नसवा.

गुंडेवार आयोगाचा अहवाल विधानपटलावर आणण्यासाठी पुन्हा जनांदोलन झाली. न्यायालयीन लढाई लढण्यात आली आणि त्या नंतर अहवाल पटलावर घेण्यात आला व प्रसिद्ध करण्यात आला. न्या. गुंडेवारांनी रमाबाई आंबेडकर नगर मधील गोळीबार हा निशस्त्र व शांत असणाऱ्या जनतेवर गरज नसताना करण्यात आला असल्याचा स्पष्ट असा अभिप्राय नोंदवला. आंबेडकरी जनतेने आंदोलनात सातत्य ठेवले म्हणून युती सरकार गडगडले आणि नंतर आघाडी सरकार आले. आघाडी सरकारच्या काळात फौजदार मनोहर कंदम वर भा.द.वी. 302 ऐवजी 304 हे कलम लाऊन तब्बल 8 वर्षांच्या विलंबानंतर फिर्याद नोंदवली व त्याचाच फायदा मनोहर कदमला झाला कार्यकर्त्यांवरील केसेसच्या सुनावण्या सुरु झाल्या. या प्रकरणाचा पाठपुरावा करनाऱ्या श्याम दादा गायकवाडांचा व रमाबाई आंबेडकर नगर हत्याकांड विरोधी संघर्ष समितीचा इतिहास संपूर्ण महाराष्ट्राने पाहिला आहे. श्यामदादा गायकवाड व त्यांच्या सोबत असणाऱ्या कार्यकर्त्यांनी जीवाची पर्वा न करता समाजाला न्याय देण्यासाठी व जातीयवादाला गाडण्यासाठी अथक परिश्रम केले त्याला तोड नाही. फौजदार मनोwहर कदमला सत्र न्यायालयाने मे 2009 मध्ये जन्मठेपेची शिक्षा सुनावली. परंतु तो आज जामिनावर मुक्त आहे. त्याने शिक्षे विरुद्ध मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल ‘केलेले असुन ते मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. रमाबाई आंबेडकर नगर हत्याकांड विरोधी संघर्ष समितीच्या लढ्याने व श्याम दादा गायकवाडांच्या पाठपुराव्यामुळे तेथील कार्यकर्ते खोट्या केसेस मधून निर्दोष सुटलेले आहेत विटंबनेच्या आरोपातून व दंगलीच्या आरोपातून कार्यकर्ते निरपराध शाबित झाले असले तरी अजूनही देशात रमाबाई आंबेडकर नगर सारख्या हत्याकांडाची कृत्यं सुरुच आहेत म्हणूनच रमाबाई आंबेडकर नगरची लढाई अजुन संपलेली नाही... रमाबाई आंबेडकर नगरच्या सर्व शूर वीर शहिदांना क्रांतिकारी अभिवादन... व जय भीम ...!!!

# लोकसंख्या लाभांश की लोकसंख्या संकट? — देशाला आता “ऑपरेशन रोजगार”ची गरज

**डॉ. भारत कऱ्हाड**



11 जुलै हा जागतिक लोकसंख्या दिन. या दिवशी जगभर लोकसंख्येची आकडेवारी, वाढीचा वेग आणि त्यातून निर्माण होणाऱ्या संधी-आव्हानांची चर्चा होते. भारताच्या संदर्भात मात्र एक वेगळाच प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो—जगातील सर्वाधिक कामकाजयोग्य वयोगटातील लोकसंख्या असलेला भारत हा खरोखर लोकसंख्या लाभांशाच्या दिशेने वाटचाल करीत आहे की बेरोजगारीमुळे हा लाभांश लोकसंख्या शापात रुपांतरित होत आहे?

भारत आज जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे. या लोकसंख्येतील मोठा हिस्सा हा काम करण्याच्या वयोगटातील आहे. अर्थशास्त्रात या परिस्थितीला लोकसंख्या लाभांश असे म्हटले जाते. एखाद्या देशात काम करणाऱ्या वयोगटातील लोकांचे प्रमाण अवलंबित लोकसंख्येपेक्षा जास्त असते, तेव्हा उत्पादन, बचत, गुंतवणूक आणि आर्थिक विकासाला मोठी चालना मिळण्याची संधी निर्माण होते. परंतु ही संधी आपोआप फळाला येत नाही. ती प्रत्यक्षात आणण्यासाठी शिक्षण, कौशल्य, उद्योग, गुंतवणूक आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे रोजगार आवश्यक असतो.

गेली अनेक वर्षे भारताच्या युवा शक्तीचे मोठे कौतुक झाले. जगातील अनेक विकसित देश वृद्धत्वाच्या समस्येला सामोरे जात असताना भारताकडे तरुण मनुष्यबळ असल्यामुळे भारत आर्थिक महासत्ता बनेल, असा आशावाद व्यक्त करण्यात आला. परंतु आज देशातील बेरोजगारीचे चित्र पाहिले, तर हा आशावाद गंभीर प्रश्नचिन्हांसमोर उभा राहतो.

दरवर्षी लाखो विद्यार्थी शिक्षण पूर्ण करून रोजगाराच्या बाजारात प्रवेश करतात. त्यांच्याकडे पदव्या आहेत, तांत्रिक ज्ञान आहे, मेहनत करण्याची तयारी आहे आणि भविष्य घडविण्याची जिद्द आहे. तरीही त्यांना त्यांच्या पात्रतेनुसार रोजगार मिळत नाही. अनेकजण वर्षानुवर्षे स्पर्धा परीक्षांच्या प्रतीक्षेत राहतात. काहीजण अल्प वेतनाच्या अस्थिर नोकऱ्या स्वीकारतात, तर काही निराशेने रोजगाराच्या शोधातूनच बाहेर पडतात. ही केवळ बेरोजगारी नाही; तर देशाच्या मौल्यवान मानवी भांडवलाचा अपुरा वापर आहे.

आपण अनेकदा लोकसंख्येला समस्या मानतो. प्रत्यक्षात लोकसंख्या ही समस्या नसते; बेरोजगार लोकसंख्या ही समस्या असते. काम करण्यास सक्षम असलेले कोट्यवधी हात जर उत्पादन प्रक्रियेत सहभागी झाले, तर ते देशाचे सर्वात मोठे संसाधन ठरतात. पण तेच हात निष्क्रिय राहिले, तर त्यातून आर्थिक विषमता, सामाजिक असंतोष, मानसिक ताण, स्थलांतर, गुन्हेगारी आणि विकासातील असमतोल निर्माण होऊ शकतो.

भारतासाठी सर्वात मोठी चिंता म्हणजे लोकसंख्या लाभांशाचा कालावधी मर्यादित आहे. पुढील काही दशकांनंतर भारतातही वृद्ध लोकसंख्येचे प्रमाण वाढेल. आजच्या तरुणांच्या उत्पादनक्षम वर्षांचा उपयोग जर रोजगारनिर्मितीसाठी झाला नाही, तर उद्या वृद्ध लोकसंख्येचा आर्थिक भार पेलण्यासाठी आवश्यक संपत्ती देशाकडे नसेल. म्हणूनच आजचा काळ भारतासाठी निर्णायक आहे. ही संधी साधली, तर भारत विकसित राष्ट्र बनू शकतो; अन्यथा इतिहास भारताची नोंद लोकसंख्या लाभांश गमावलेल्या देशांमध्ये करेल.

या परिस्थितीचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे शिक्षण आणि रोजगार यांच्यातील वाढती दरी. उच्च शिक्षण घेणाऱ्यांची संख्या वाढत आहे; पण उद्योगांना आवश्यक असलेली कौशल्ये अनेक विद्यार्थ्यांकडे नाहीत. दुसरीकडे, कौशल्य असलेल्या अनेक युवकांसाठी पुरेशा संधी उपलब्ध नाहीत. त्यामुळे शिक्षण, कौशल्यविकास आणि उद्योग यांच्यात सुसंगती निर्माण करणे अत्यावश्यक आहे.

आज कृत्रिम बुद्धिमत्ता, स्वयंचलन आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे रोजगाराचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. अशा वेळी भारताने केवळ पदवी देणारी नव्हे, तर रोजगारक्षम नागरिक घडविणारी शिक्षणव्यवस्था उभारली पाहिजे. नवउद्योग, उत्पादन क्षेत्र, कृषी प्रक्रिया, पर्यटन, हरित ऊर्जा, आरोग्यसेवा, संशोधन, डिजिटल सेवा आणि निर्यातक्षम उद्योग यांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती करणे ही राष्ट्रीय गरज आहे.

आज देशात विविध प्रकारच्या “ऑपरेशन्स”ची चर्चा होत असते. त्यांचे स्वरुप, उद्दिष्टे आणि संदर्भ वेगवेगळे असतात. परंतु देशाच्या आर्थिक भविष्याचा विचार करता आता राष्ट्रीय प्राधान्यक्रम बदलण्याची गरज आहे. भारताला आज सर्वाधिक गरज आहे ती “ऑपरेशन रोजगार”ची.

ऑपरेशन रोजगार ही केवळ सरकारी योजना नसावी; ती राष्ट्रीय विकासाची व्यापक चळवळ असावी. प्रत्येक मंत्रालय, प्रत्येक राज्य, प्रत्येक जिल्हा आणि प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्था यांनी रोजगारनिर्मिती हे आपले प्रमुख उद्दिष्ट मानले पाहिजे. प्रत्येक नवीन उद्योगातून किती रोजगार निर्माण होतील, प्रत्येक पायाभूत सुविधा प्रकल्पातून किती रोजगार उपलब्ध होतील, प्रत्येक शैक्षणिक सुधारणेतून किती युवक रोजगारक्षम होतील आणि प्रत्येक गुंतवणुकीतून किती कुटुंबांचे जीवनमान उंचावेल, याचे मोजमाप झाले पाहिजे.

रोजगार हा केवळ अर्थव्यवस्थेचा विषय नाही; तो सामाजिक न्याय, राष्ट्रीय एकात्मता आणि लोकशाहीच्या स्थैर्याचाही विषय आहे. हाताला काम असेल, तर माणूस आत्मविश्वासाने जगतो; कुटुंब सक्षम होते; समाज स्थिर राहतो आणि राष्ट्र समृद्ध होते. म्हणूनच रोजगारनिर्मितीला खर्च नव्हे, तर राष्ट्रनिर्मितीतील सर्वोच्च गुंतवणूक म्हणून पाहिले पाहिजे.

जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त आपण लोकसंख्या वाढीवर चर्चा करू; पण त्याचबरोबर प्रत्येक तरुणाला एक प्रश्न विचारला पाहिजे—तुमच्या शिक्षणाला सन्मानाचे काम मिळत आहे का? आणि प्रत्येक सरकारला एक प्रश्न विचारला पाहिजे—तुमच्या प्रत्येक धोरणातून किती रोजगार निर्माण झाले? याच प्रश्नांच्या उत्तरांत भारताचे भविष्य दडलेले आहे.

आज देशासाठी सर्वात मोठी घोषणा अशी असली पाहिजे—

“ऑपरेशन तुडवा” नव्हे, “ऑपरेशन रोजगार”.

कारण पक्षांपेक्षा देश मोठा आहे, सत्तेपेक्षा समाज मोठा आहे आणि घोषणांपेक्षा रोजगार मोठा आहे.

भारताचा खरा प्रश्न लोकसंख्या नाही; भारताचा खरा प्रश्न म्हणजे प्रत्येक सक्षम हाताला सन्मानाचे काम मिळवून देणे. तो दिवस ज्या दिवशी उगवेल, त्या दिवशी भारताचा लोकसंख्या लाभांश हा केवळ अर्थशास्त्रातील सिद्धांत राहणार नाही, तर विकसित भारताचा सर्वात भक्कम पाया बनेल.

**– डॉ. भारत द. कऱ्हाड,**
**प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

# प्रवासी आराध्य दैवत; तर परिवहन विभाग उपासक!

**(एसटी प्रवासीराजा दिवस विशेष.)**

_प्रवाशांना एसटी बसस्थानक, बसस्थानकांवरील प्रसाधनगृहे ही स्वच्छ, निर्जंतुक आणि टापटीप असावीत असे वाटते. तसेच एसटी बसेस स्वच्छ व वेळापत्रकानुसार वेळेत मार्गस्थ व्हाव्यात, ठरलेले थांबे घ्यावेत, चालक-वाहक यांनी प्रवाशांशी सौजन्याने वागावे. कमी केलेल्या बसफेऱ्या पुनश्च सुरु कराव्यात. प्रवाशी संख्या विचारात घेऊन ज्यादा बसफेऱ्या वाढवाव्यात. रस्ता तयार असलेल्या गावांसाठी नवीन बसफेऱ्या सुरु कराव्यात. “हात दाखवा, गाडी थांबवा” ही योजना पुन्हा नियमितपणे राबवली जावी, अशी किमान अपेक्षा प्रवाशांकडून व्यक्त केली जाताहे. प्रवासी राजा दिनावर श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींचा मार्गदर्शक संकलित लेख प्रवाशांच्या सेवेशी सविनय सादर... संपादक._

एसटीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या समस्या, तक्रारी वजा सूचना यांचे स्थानिक पातळीवर जलद गतीने निराकरणासाठी आता राज्यातील प्रत्येक आगार- डेपोमध्ये दर सोमवारी व शुक्रवारी एसटी प्रवासी राजा दिन आयोजित केला जाईल. त्यानुसार एसटीच्या विभाग नियंत्रकांना एका आगारात जाऊन प्रवाशांच्या समस्या, तक्रारी, सुचना ऐकून घ्याव्या लागणार आहेत. “प्रवासी आपला आराध्य दैवत; तर परिवहन विभाग उपासक!” असेच काहीसे चित्र दिसेल. एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांच्या भन्नाट संकल्पनेतून हा प्रयोग राबवला जाणार आहे. एसटी महामंडळाने या प्रकल्पानुसार प्रवाश्यांच्या समस्यांना गांभिर्याने घेत त्या तातडीने सोडविण्याच्या दृष्टीने उपाययोजनेसाठी हा उपक्रम राबवण्याचे निश्चित केले आहे. त्यामुळे प्रवाशांचे समाधान होऊन प्रवासी सेवेचा दर्जा व गुणवत्ता वाढण्यास मदत होईल. ही अभिनव योजना दि.15 जुलै 2024पासून सुरु आहे. शहरी व खेडूत प्रवासी, प्रवासी संघटना, शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी-शिक्षक आपल्या समस्या-तक्रारी, सुचना लेखी स्वरूपात दर सोमवारी व शुक्रवारी संबंधित आगारात सकाळी 10 ते 2 या वेळेत मांडू शकतात. त्यावर विभाग नियंत्रक तातडीने कार्यवाही करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. प्रवासी राजा दिन कोणत्या दिवशी कोणत्या आगारात होणार आहे, याचे वेळापत्रक विभाग नियंत्रक त्या त्या वेळी जाहीर करतील. विशेष म्हणजे प्रत्येक लेखी तक्रारीची नोंद ठेवण्यात येणार असून याबाबत काय कार्यवाही केली आहे, यावर मध्यवर्ती कार्यालय लक्ष ठेवणार आहे. त्यावर योग्य कार्यवाही तसेच तक्रारदारांचे समाधान करणारी योग्य उपाययोजना करणे संबंधीत कार्यालयास भाग पडणार आहे, असा विश्वास वाटतो.

एसटीच्या विविध बसेस मधून दररोज सुमारे 54 ते 55 लाख प्रवाशांची सुरक्षित वाहतूक केली जाते. प्रवाशांना एसटी बसस्थानक, बसस्थानकांवरील प्रसाधनगृहे ही स्वच्छ, निर्जंतुक आणि टापटीप असावीत असे वाटते. तसेच एसटी बसेस स्वच्छ व वेळापत्रकानुसार वेळेत मार्गस्थ व्हाव्यात, ठरलेले थांबे घ्यावेत, चालक-वाहक यांनी प्रवाशांशी सौजन्याने वागावे. कमी केलेल्या बसफेऱ्या पुनश्च सुरु कराव्यात. प्रवाशी संख्या विचारात घेऊन ज्यादा बसफेऱ्या वाढवाव्यात. रस्ता तयार असलेल्या गावांसाठी नवीन बसफेऱ्या सुरु कराव्यात. “हात दाखवा, गाडी थांबवा” ही योजना पुन्हा नियमितपणे राबवली जावी, अशी किमान अपेक्षा प्रवाशांकडून व्यक्त केली जाताहे. यासंबंधित प्रवाशी तक्रारींचे निराकरण वेळेत न झाल्याने प्रवाशांना गैरसोईचा सामना करावा लागतो. या समस्यांचे निराकरण स्थानिक पातळीवर तातडीने होऊ शकते. प्रवासी सेवेचा दर्जा आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रवाशांच्या समस्यांचे वेळीच निराकरण होणे अत्यंत आवश्यक आहे. तसे झाल्यास प्रवाशांना समाधानकारक सेवा देणे एसटी महामंडळाला शक्य होणार आहे. अर्थात, प्रवाशांचे महत्तम समाधान हा उद्देश ठेऊन येत्या दि.15 जुलै 2024 पासून प्रवासी राजा दिन या अभिनव योजनेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व प्रवासी बंधू-भगिनींनी या योजनेचा लाभ घेऊन आपल्या समस्यांचे निराकरण करुन घ्यावे आणि आपले एसटी बसवरील प्रेम, विश्वास, निष्ठा व गरज आजही काही कमी झाले नाही, हे सिद्ध करून दाखवावेच.

प्रवासी सेवेचा दर्जा आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रवाशांच्या समस्यांचे वेळीच निराकरण होणे अत्यंत आवश्यक आहे. तसे झाल्यास प्रवाशांना समाधानकारक सेवा देणे एसटी महामंडळाला शक्य सोयीचे होणार आहे. अर्थात प्रवाशांचे महत्तम समाधान हा उद्देश ठेऊन येत्या सोमवार, दि.15 जुलै 2024पासून “एसटी प्रवासी राजा दिन” या अभिनव योजनेचे आयोजन करण्यात आले आहे, ही एक अत्यंत महत्वाची, आनंदाची आणि अभिमानास्पद बाब आहे. आपण कधी कधी लांब पल्ल्याचा किंवा अपरिहार्य प्रवास अनिच्छेनेच करत असतो. यादरम्यान अनेकदा प्रवाशांना एसटी संबंधित विविध समस्यांचा सामना करावा लागतो. अस्वच्छ स्थानक, गलिच्छ प्रसाधनगृहे, वाहकांची अरेरावी, बंद पडणाऱ्या गाड्या, थांब्यावरील हॉटेलमध्ये महागडी सेवा या सार्वत्रिक तक्रारी आहेत. गाडी वेळेत न सुटणे किंवा ऐनवेळी रद्द होणे, गळक्या किंवा नादुरुस्त बसेस लावणे, हा अनुभवही वारंवार येतो. विशेषतः स्कुलबसेस व शिवशाहीबद्दल तक्रारी सर्वाधिक आहेत. या सर्व तक्रारी आता थेट विभाग नियंत्रकांसमोर मांडता येतील आणि सुखद, समाधानी सेवा निश्चितच मिळेल, अशी अपेक्षा करुया!

!! एसटी प्रवासी राजा दिन मोहिमेच्या सर्व प्रवासी बांधवांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

**-- श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली, जि.गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सअॅप- 9423714883.**

# परळीचे सुपुत्र किरण गित्ते (IAS) यांच्या ऐतिहासिक नियोजनातून त्रिपुरात 1.21 लाख कोटींची विक्रमी गुंतवणूक!

**‘डेस्टिनेशन त्रिपुरा बिझनेस कॉन्क्लेव्ह 2026’ मध्ये जागतिक कंपन्यांसह 10 देशांच्या राजदूतांची उपस्थिती; गित्ते साहेबांच्या धोरणात्मक नेतृत्वाचे देशपातळीवर कौतुक.**

**परळी (प्रतिनिधी) परळीचे सुपुत्र आणि त्रिपुरा शासनाचे उद्योग व वाणिज्य सचिव, माननीय श्री. किरण गित्ते साहेब (IAS) यांच्या दूरदृष्टी, उत्कृष्ट नियोजन आणि प्रशासकीय कौशल्यातून त्रिपुरा राज्याने औद्योगिक क्षेत्रात एक नवा इतिहास रचला आहे. गित्ते साहेबांच्या मुख्य नियोजनातून आयोजित करण्यात आलेला दोन दिवसीय ‘डेस्टिनेशन त्रिपुरा बिझनेस कॉन्क्लेव्ह २०२६’ अत्यंत यशस्वीरीत्या संपन्न झाला. या परिषदेच्या माध्यमातून त्रिपुरा राज्यामध्ये तब्बल १,२१,३०३+ कोटी रुपयांच्या ऐतिहासिक गुंतवणुकीचे उद्दिष्ट असणारे ३४२ हून अधिक सामंजस्य करार (MoUs) करण्यात आले आहेत. ईशान्य भारताला जागतिक गुंतवणुकीचे केंद्र बनवण्याच्या या मोहिमेचे मुख्य सूत्रधार म्हणून किरण गित्ते साहेबांच्या नावाचा आणि नेतृत्वाचा गौरव होत आहे.**

केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री आणि जागतिक दिग्गजांची उपस्थितीया भव्य परिषदेचे उद्घाटन त्रिपुराचे माननीय मुख्यमंत्री प्रा. (डॉ.) माणिक साहा यांच्या हस्ते झाले. तर भारत सरकारचे वाणिज्य आणि उद्योग मंत्री श्री. पियुष गोयल आणि ईशान्य प्रदेश विकास व दळणवळण मंत्री श्री. ज्योतिरादित्य एम. सिंधिया यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

विशेष म्हणजे, किरण गित्ते साहेबांच्या धोरणात्मक प्रयत्नांमुळे जागतिक स्तरावरील 10 देशांचे राजदूत आणि उच्चायुक्त या परिषदेला प्रामुख्याने उपस्थित होते. यामध्ये:



बांगलादेश: उच्चायुक्त महामहिम श्री. एम. रियाझ हमीदुल्ला व सहायक उच्चायुक्त श्री. झिक्रुल हसन फहद

फिलीपिन्स: वाणिज्यदूत सुश्री मेलिसा अॅन तेलान

तिमोर-लेस्ते: राजदूत महामहिम श्री. कार्लिटो न्युनेस

लाओस: राजदूत महामहिम श्रीमती विथया झायवोंग

कझाकस्तान: उपराजदूत श्री. डारखान सेतेनोव्हचिली: राजदूत महामहिम श्री. जुआन रोलँडो अँगुलो मॉन्साल्वेनेपाळ: प्रभारी डॉ. सुरेंद्र थापा व आर्थिक सल्लागार श्री. रवींद्र जंग थापाउझबेकिस्तान: आर्थिक सल्लागार श्री. अब्दुलअजीज अब्दुखालिलोव्ह

दक्षिण आफ्रिका: उप उच्चायुक्त श्री. सेड्रिक चार्ल्स क्रॉलीजपान (JETRO): वरिष्ठ संचालक सुश्री हारुका मारुयामा यांचा समावेश होता.देशातील पहिल्या क्रमांकाच्या सुधारणांचे ‘कॅबिनेट सचिवालयाकडून’ कौतुकपरिषदेत बोलताना भारत सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार डॉ. व्ही. अनंत नागेश्वरन आणि कॅबिनेट सचिवालयाचे विशेष सचिव श्री. केशव कुमार पाठक यांनी त्रिपुरा राज्याचे विशेष कौतुक केले. ‘अनुपालन कपात आणि नियमनमुक्ती उपक्रमा’अंतर्गत सर्व 51 प्राधान्यक्रमाच्या सुधारणा पूर्ण करणारे त्रिपुरा हे भारतातील पहिले राज्य ठरले आहे. गित्ते साहेबांच्या मार्गदर्शनाखाली नोकरशाहीतील अडथळे दूर करून ‘एक-खिडकी मंजुरी’ (Single Window Clearance) आणि डिजिटल प्रशासनामुळे राज्याने ‘व्यवसाय सुलभतेत’ (Ease of Doing Business) देशात अव्वल स्थान मिळवले असून इतर राज्यांसाठी त्रिपुरा आदर्श बनले असल्याचे त्यांनी सांगितले. गुगल, सेल्सफोर्ससह नामांकित कंपन्यांची मोठी भागीदारीया कॉन्क्लेव्हमध्ये राज्यातील आणि देशाबाहेरील 1,200 हून अधिक संस्थांमधून 2,000 हून अधिक मोठे गुंतवणूकदार सहभागी झाले होते. यामध्ये आयटीसी वेलकम ग्रुप, जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (JITO), गुगल (Google), सेल्सफोर्स (Salesforce), लुलू ग्रुप इंटरनॅशनल, मॅक्लेक, अंबुजा निओटिया, पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन, एनएलसी इंडिया, जीआयझेड जर्मनी यांसारख्या बलाढ्य कंपन्यांशी आयटी, एआय, हॉस्पिटॅलिटी, वैद्यकीय शिक्षण आणि ऊर्जा क्षेत्रासाठी 10 प्रमुख विशेष करारांची देवाणघेवाण झाली. क्षेत्रनिहाय गुंतवणुकीचे सविस्तर वर्गीकरण (1,21,303+ कोटी):किरण गित्ते साहेबांनी तयार केलेल्या क्षेत्र-विशिष्ट (Sector-specific) धोरणामुळे सर्वच विभागांना मोठी गुंतवणूक मिळाली आहे:उद्योग आणि वाणिज्य: रु. 30,000 कोटीऊर्जा क्षेत्र (TSECL - 18,100 कोटी + TREDA - 12,980 कोटी): एकूण रु. 31,080 कोटीशहरी पायाभूत सुविधा: रु. 15,742 कोटीमाहिती तंत्रज्ञान (IT & AI): रु. 13,248 कोटीपर्यटन व परिवहन (पर्यटन - 12,303 कोटी + परिवहन - 3,056 कोटी): एकूण रु. 15,359 कोटीआरोग्य व वैद्यकीय शिक्षण: रु. 4,000 कोटीउच्च शिक्षण व शालेय शिक्षण: रु. 3,568 कोटी

बांबू, रबर, अगरवुड लागवड व प्रक्रिया: रु. 1,700 कोटीकृषी, फलोत्पादन, मत्स्य आणि पशुधन (ARDD): रु. 4,553 कोटीपरळीकरांसाठी आणि महाराष्ट्रासाठी गौरवास्पद कामगिरी!त्रिपुरा मंत्रिमंडळातील सर्व प्रमुख मंत्री अनुक्रमे श्री. रतनलाल नाथ (ऊर्जा व कृषी), श्रीमती संताना चकमा (उद्योग), श्री. सुशांत चौधरी (पर्यटन), श्री. टिंकू रॉय (कामगार), श्री. शुक्ला चरण नोतिया (सहकार) आणि श्री. अनिमेश देबबर्मा (वन) यांनी गित्ते साहेबांच्या या संपूर्ण नियोजनाचे आणि गुंतवणुकीच्या धोरणाचे स्वागत केले आहे.एका छोट्याशा राज्यात थेट जागतिक पातळीवरील गुंतवणूकदारांना आकर्षित करून 1.21 लाख कोटींचा टप्पा पार करून देणारे मुख्य आयोजक हे परळीचे सुपुत्र श्री. किरण गित्ते राहिल्यामुळे, संपूर्ण बीड जिल्ह्यात आणि महाराष्ट्रात त्यांच्या या ऐतिहासिक प्रशासकीय कामगिरीचे प्रचंड कौतुक होत असून परळीची मान देशात उंचावली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी अॅक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

आल्यास याचप्रमाणे कठोर आदेश दिले जातील, असा इशाराही न्यायालयाने दिला.

------------------------------------

दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादरम्यान मुख्यमंत्री फडणवीसांनी राज्यातील विविध घडामोडींवर भाष्य केलं. यावेळी त्यांनी केंद्रीत मंत्रिमंडळात जाण्याच्या चर्चेवर उपरोधिक भाष्य केलं. तर कर्जमाफीवर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'काल सभागृहात सांगितले. यापूर्वीच्या कर्जमाफीत लगतच्या कर्जमाफीच्या लोकांना समाविष्ट केलं नव्हतं. पहिल्यांदा आपण हा निर्णय घेतला की, मागची कर्जमाफी होती. जी महात्मा फुले योजनेअंतर्गत कर्जमाफी होती, त्यात ज्यांना माफी मिळाली होती. परंतु ते आता डिफॉल्टमध्ये गेले आहेत. त्यांना आधी 50 हजारापर्यंत रिलीफ देणार होतो. परंतु सत्तारुढ पक्षाचा आग्रह होता की, त्यांना संपूर्ण कर्जमाफी द्या. आपण ते मान्य केले. ही महाराष्ट्रातील इतिहासातील सर्वात मोठी कर्जमाफी आहे'. तर कर्जमाफीचं शरद पवारांनी स्वागत केलं होतं. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवारांचे आभार मानले.विदर्भाच्या हवामानावर भाष्य करताना म्हटलं की, 'विदर्भात पाऊस लांबला. साधारणपणे मधल्या दिवसांत पिकांना संरक्षणात्मक सिंचन दिल्यास अडचण येणार नाही. यावेळी अलनिनोमुळे पावसाची तुट राहणार आहे. दोन पावसांमध्ये अंतर राहील. यासाठी शेतकऱ्यांना सांगितलं आहे की, धूळ पेरणीवर अवलंबून न राहता, उशिरा पेरण्या करा. त्यांनी त्या केल्या आहेत. आता विहिरी, सिंचनाचा वापर करून शेतकरी पिके वाचवू शकतात'.बोगस बियाणांवर भाष्य करताना मुख्यमंत्री म्हणाले, 'कमी गुणवत्ता असलेले बियाणे सोयाबीनचे बियाणे हे विशेषत: विदर्भात आढळलं आहे. त्याच्यावर तात्काळ कारवाई केली आहे. 5000 नमुने घेतले आहेत. त्यातील 300 नमुने फेल झालेत. त्यांच्यावर लायसन्स रद्द करणे ते फौजदारी कारवाया होतील'. मोशीजवळ इमारतीचे काही मजले अनधिकृत असल्याचे समोर आलेत, यावर फडणवीस म्हणाले, 'या संदर्भात चौकशीचे आदेश दिले आहेत. सर्वात प्रथम तिथून लोक बाहेर काढणे. त्याला प्राधान्य दिलं आहे. लोकांना बाहेर काढण्याचं काम संपत आहे. त्यानंतर या प्रकरणी कारवाई केली जाईल'.

---------------------------------------

भाजपामध्ये, तर कधी शिवसेनेत. मी काल खासदार भास्कर भगरे सरांना म्हटलं की, आता फक्त मनसेमध्ये आपलं नाव लागलं नाही. अन्यथा बाकी सगळे पक्ष झालेत", अशी मिश्कील टिपण्णी सुप्रिया सुळे यांनी केली.आम्ही आपआपसात असं ठरवलं की आता भारतात नको, आता आपण इंटरनॅशनल स्तरावर जाऊया. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे 8 खासदार आता डोनाल्ड ट्रम्प यांच्या नेतृत्वाखाली काम करूया, चला अमेरिका. असंच झालंय ना. आता जोक केले जात आहेत, काय दुर्दैव आहे. काय चेष्टा मस्करी लावली. आम्ही लोकप्रतिनिधी आहोत, आम्ही पॉलिसी मेकर्स आहोत", अशा शब्दांत सुप्रिया सुळे यांनी संताप व्यक्त केला आहे.आमची आणि काँग्रेसची पक्षाच्या विलीनीकरणावर कोणतीही चर्चा झालेली नाही. तसा कोणताही प्रस्ताव दोन्ही बाजूंकडून आलेला नाही. आम्ही केवळ महाविकास आघाडीतील मजबूत मित्रपक्ष म्हणून एकत्र आहोत," असं स्पष्टीकरण काही दिवसांपूर्वी झालेल्या एका पत्रकार परिषदेत खासदार सुप्रिया सुळे यांनी दिलं होतं. सुप्रिया सुळे म्हणाल्या होत्या की, "आमचे आणि काँग्रेसचे अतिशय कौटुंबिक आणि सलोख्याचे संबंध आहेत. परंतु, काँग्रेसकडून विलीनीकरणाबाबत कोणताही प्रस्ताव आलेला नाही आणि आम्हीही तसा विचार केलेला नाही. आम्ही महाविकास आघाडी म्हणून एकत्र आहोत आणि पुढेही एकत्रच लढू," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

---------------------------------------

दरम्यान, शरद पवारांनी महाराष्ट्र सरकारचं कौतुक केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील शरद पवार यांचे आभार मानले आहेत.शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत मी विधानसभेत सांगितलं की, याआधी झालेल्या कोणत्याही कर्जमाफीच्या योजनेत लगतच्या कर्जमाफीत लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना लाभ देण्यात आलेला नव्हता. पण आपण पहिल्यांदा हा निर्णय केला. महात्मा फुले कर्जमाफी योजनेचा ज्या शेतकऱ्यांनी लाभ घेतला होता, त्यांना आधी आपण 50 हजार रुपयांपर्यंत लाभ देणार होतो. मात्र, सत्ताधारी सर्व आमदारांचा आग्रह होता की शेतकऱ्यांना पूर्ण कर्जमाफी द्या, आपण देखील ती मागणी मान्य केली. त्यामुळे महाराष्ट्राच्या इतिहासातील ही सर्वात मोठी कर्जमाफी आहे", असं मुख्यमंत्री फडणवीसांनी सांगितलं.

------------------------------------

पुनरावलोकन (मॅपिंग) करत आहेत. नागरिकांनी त्यांच्याशी संपर्क साधून "गणना प्रपत्र" आपल्या कुटुंबासहित भरणे आवश्यक आहे.

आता जे मॅपिंग करणार नाहीत त्यांची नावे मतदार यादीतून वगळली जाणार आहेत. पुन्हा यादीत नाव समाविष्ट करण्यासाठीची प्रक्रिया अतिशय क्लिष्ट व किचकट आहे नंतर मतदारांना मतदान यादीत नाव लावण्यासाठी तहसील आणि इतर ठिकाणी अनेक फेऱ्या माराव्या लागणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी निष्काळजी न करता या प्रक्रियेत सहभागी होऊन आपली व आपल्या कुटुंबियांची मॅपिंग तात्काळ करून घ्यावी असे आवाहन परळी नगरपरिषदेचे बांधकाम सभापती तथा भाजपाचे BLA- 1 परळी विधानसभा प्रमुख प्रा. पवन मुंडे यांनी केले आहे.

------------------------------------

तीव्र निदर्शने करण्यात आली. यासंदर्भात माजलगाव तहसीलदारांमार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांना मागण्यांचे निवेदन पाठवण्यात आले.

निवेदनात नमूद केल्यानुसार, शासनाने कर्जमाफीचा निर्णय घेतला असला तरी, या योजनेमध्ये यापूर्वीच्या दोन्ही कर्जमाफीपेक्षा अत्यंत कडक आणि जाचक अटी लावण्यात आल्या आहेत. यामुळे राज्यातील लाखो शेतकरी या लाभापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली आहे. या जाचक अटींचा निषेध करण्यासाठी किसान सभेने राज्यभर आंदोलनाचे हत्यार उपसले आहे.

यावेळी खालील मागण्यांचे निवेदन देण्यात आलेदोन लाखांची मर्यादा हटवा:* दोन लाखांच्या वर कर्ज असलेल्या सुमारे 2 लाख 90 हजार शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी.

2019 च्या कर्जदार शेतकऱ्यांना न्याय द्या: नैसर्गिक आपत्तीमुळे सातत्याने नुकसान झालेल्या 2019 नंतरच्या बाधित शेतकऱ्यांना अटींशिवाय कर्जमाफीचा लाभ मिळावा.नियमित कर्जदारांना संपूर्ण लाभ: नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदानाच्या नावाखाली लावलेल्या जाचक अटी रद्द करून पूर्ण लाभ द्यावा. अल्पभूधारक लोकप्रतिनिधी व कर्मचाऱ्यांना वगळू नका:** साखर कारखाने, सूतगिरण्या, कृषी उत्पन्न बाजार समिती मधील गरीब कर्मचारी तसेच ग्रामपंचायत, जिल्हा परिषदेचे गरीब लोकप्रतिनिधी यांना कर्जमाफीतून वगळण्याचा निर्णय अन्यायकारक असून तो मागे घ्यावा.शेतीपूरक कर्जेही माफ करा:केवळ पीक कर्जच नव्हे तर विहीर, शेती पंप, शेडनेट, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय तसेच मायक्रो फायनान्स व सावकारी कर्जेही माफ करण्यात यावीत.

या आंदोलनाचे नेतृत्व कॉ. मुसद्दीक बाबासाहेब (जिल्हा माकप नेते), कॉ. गणेश अच्युतराव कदम, कॉ. अशोक डोके (तालुका अध्यक्ष, माजलगाव), कॉ. कृष्णा सोळंके (तालुका सचिव), कॉ. दत्ता कचरे, कॉ. अरुण गरड, कॉ. रोहिदास आबुज, कॉ. दत्ता घुले, कॉ. विजय गरड आणि महाराष्ट्र कोथिंबिरे यांच्यासह अनेक शेतकरी व पदाधिकाऱ्यांनी केले. मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा किसान सभेच्या वतीने देण्यात आला आहे.

------------------------------------------

कोषाध्यक्षा सुरेखा बेंडसूरे, इडिटर अनिता धुमाळ तसेच मधुबाला कांकरिया यांनीही आपल्या पदाची सूत्रे स्वीकारली.

समारंभास परळीच्या माजी नगराध्यक्षा सरोजनी हालगे, विद्या मंडलेचा, संगीता रेवडकर, मनीषा खाकरे, विजया दहिवाळ, विद्या गुजर, सुनीता वाघमोडे, सरला उपाध्याय, सुशीला राजमाने, सुचिता करमाळाकर, शोभना सौंदळे, उर्मिला कांकरिया, श्रद्धा हालगे, सविता दुबे, रुक्मिणी अग्रवाल, सरोजा धुमाळ आदींसह क्लबच्या सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

यावेळी प्रा. डॉ. अर्धापूरे यांनी मार्गदर्शन केले. सामाजिक कार्यात महिलांची भूमिका आणि इनरव्हील क्लबच्या उपक्रमांचे महत्त्व आशा धुमाळ यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमानंतर हनुमान मंदिर परिसरात नूतन पदाधिकाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

---------------------------------------

शाळेची जीर्ण अवस्था लक्षात घेता आवश्यक दुरुस्तीचे काम लवकरात लवकर हाती घेण्यात येईल, असे आश्वासन शिक्षण सभापती योगेश मेणकुदळे यांनी मुख्याध्यापक व शिक्षकांना दिले. त्यांच्या या भेटीमुळे शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

---------------------------------------

असुन या यात्रेच्या स्वागतास समाजबांधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन बंजारा समाजाचे सेवागड विश्वस्त परळी वैजनाथ अमर पवार यांनी केले आहे.

बंजारा समाज एकता यात्रा बंजारा धर्मगुरु बाबुसिंग महाराज पोवाडा गड तसेच धर्माधिकारी आंध्र प्रदेशचे संत सेवालाल चॅरिटेबल ट्रस्ट सेवागड श्री जी महाराज यांनी आयोजित केली असुन ही यात्रा ही 5 जुलै सेवागढ आंध्र प्रदेश येथून निघणार आहे 18 राज्यातुन बंजारा एकतेचा संदेश देत दि.26 जुलै रोजी दिल्ली येथे पोंहोचणार आहे. यात्रेदरम्यान भगवंतसेवक किशन राठोड यात्रेनिमित्त देशातील बंजारा समाजांना पांढर्या ध्वजाखाली एकत्र आणण्याचा संकल्प करणार आहेत.यात्रेचे नियोजन प्रवीण राठोड,सदाशिव चव्हाण हे करत आहेत. सदरील यात्रा रविवार दि.12 जुलै रोजी सकाळी 10 वाजता पोलिस ठाण्यासमोरील संत सेवालाल महाराज चौकात येणार आहे.यावेळी यात्रेचे भव्य स्वागत केले जाणार असून बंजारा यावेळी समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन बंजारा समाज सेवागड विश्वस्त परळी वैजनाथ अमर पवार यांनी केले आहे.

--------------------------------

होत्या. कायनात धार यांचे पवार कुटुंबाशी जिव्हाळ्याचे संबंध आहेत. मध्यंतरी कायनात धार आणि पार्थ पवार उज्जैनच्या प्रसिद्ध महाकाल मंदिरात एकत्र पूजा करताना दिसले होते.अजित पवार यांचं विमान अपघातात निधन झाल्यानंतर पार्थ पवार राजकारणात मोठ्या प्रमाणात सक्रीय झाले आहेत. मध्यंतरी पार्थ पवारांवर जमीन घोटाळ्यांचे आरोप झाले होते. सध्या दिल्लीत ते राष्ट्रवादी काँग्रेसकडून खासदारकीची जबाबदारी संभाळत आहेत. अजित पवार यांचं जानेवारी महिन्याच्या 28 तारखेला विमान अपघातात निधन झालं. बारामती एअरपोर्टजवळ त्यांचं विमान कोसळलं. त्यानंतर सुनेत्रा पवार यांच्या हातात राष्ट्रवादी काँग्रेसची कमान आली. अजित पवार यांना दोन मुलं आहेत. त्यांचा धाकटा सुपूत्र जय पवार याचं अजितदादांच्या हयातीत परदेशात लग्न झालं होतं. जय पवार सुद्धा राजकारणात सक्रीय आहे.

--------------------------------------

चांगला पाऊस होईल. मुंबईत जसा पाऊस झाला, तसाच या काळात विदर्भातही पाऊस होईल, असंही भाकित डख यांनी केलं आहे. तसेच विदर्भातील शेतकऱ्यांनी 20 जुलैपर्यंत शेतीतील सर्व कामे करून घ्यावीत, असे आवाहनही त्यांनी केले आहे.सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे पंढरपूरची दिंडी परतल्यानंतर राज्यात पुन्हा जोरात पाऊस होईल. 27 जुलैपासून ते 5 ऑगस्टपर्यंत एकदम जोराचा पाऊस होईल. हा पाऊस सगळीकडेच असेल. अहिल्यानगर, पुणे, नाशिक जिल्ह्यात 21 तारखेनंतर चांगला पाऊस होईल. अनेक ठिकाणी अजूनही पाऊस झालेला नाही. यामध्ये नंदूरबार, सोलापूर या जिल्ह्यातील काही भागांचा समावेश आहे. लातूर, धाराशीव, बीड, बीड, नांदेड, सांगली या जिल्ह्यातील काही भागातही अजूनही चांगला पाऊस झालेला नाही. या भागातही 21 जुलै ते 5 ऑगस्टच्या काळात दररोज वेगवेगळ्या ठिकाणी पाऊस होईल. नंदूरबार जिल्ह्यात 15 जुलैच्या नंतर पाऊस पडेल, असा महत्त्वाचा अंदाज त्यांनी व्यक्त केलाय.

## पान 4 वरुन

अज्ञातांनी केलेल्या मारहाणीत गंभीर जखमी झाल्यानंतरही दिंडीचालक त्रिंबक कोळेकर यांनी वारीचा पुढील प्रवास सुरु ठेवला आहे. मात्र, या प्रकरणात अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने वारकरी समाजातून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

--------------------------------------

शबाना अरुण काळे (वय 26 वर्षे, रा. पारनेर, ता. पाटोदा, जि. बीड) असल्याचे स्पष्ट झाले त्यानुसार त्यांना नेकनूर पोलिसांनी शुक्रवारी ताब्यात घेतले. बसस्थानक अथवा बसमध्ये प्रवास करणाऱ्या एकट्या महिलांना हेरुन त्यांच्याशी संवाद साधला जात असे."गर्दीमध्ये गळ्यातील सोन्याचे दागिने चोरीला जाऊ शकतात. माझ्यासोबतही अशी घटना घडली होती, त्यामुळे दागिने पिशवीत ठेवा," असे सांगून पीडित महिलेचा विश्वास संपादन केला जात असे. त्यानंतर आरोपी महिला स्वतःबरोबर असलेल्या लहान मुलाला दूध पाजण्याचा किंवा इतर कारणाने संवाद वाढवत पीडित महिलेशी जवळीक साधत असत. दोन्ही आरोपी महिला पीडितेला सतत बोलण्यात गुंतवून तिचे लक्ष विचलित करत असत. योग्य संधी साधून हातचलाखीने पिशवीतील सोन्याचे दागिने चोरुन गर्दीचा फायदा घेत घटनास्थळावरुन पसार होत असत. सदरची कामगिरी नेकनूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि मंगेश साळवे यांच्या नेतृत्वात पोह विशाल क्षीरसागर, पोह विद्वान कांबळे व पोह मुळे यांनी पार पाडली आहे.

-----------------------------------------

रवाना करण्यात आली आहेत.9 जुलै 2026 रोजी नेकनूर पोलिस ठाण्यात गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादी श्रीपाद कृष्णाजी कुलकर्णी (रा. भूम) हे आपल्या कुटुंबासह चारचाकी वाहनातून जात असताना मांजरसुंबा घाट परिसरात आरोपींनी त्यांच्या वाहनाचा पाठलाग करून वाहन आडवे लावत त्यांना जबरदस्तीने थांबविले. त्यानंतर आरोपींनी कोयत्याचा धाक दाखवत फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांना मारहाण केली, जीवे मारण्याची धमकी दिली आणि सोन्याची अंगठी, रोख रक्कम व इतर मौल्यवान वस्तू लुटल्या. एवढ्यावरच न थांबता फिर्यादीचे एटीएम कार्ड ताब्यात घेऊन त्याचा पासवर्ड मिळविण्यात आला. त्यानंतर खात्यातून रोख रक्कम काढण्यात आली. मोबाईलवरील ऑनलाइन बँकिंग सुविधेचाही गैरवापर करून विविध व्यवहारांद्वारे रक्कम हस्तांतरित करण्यात आली. आरोपींनी फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांना इच्छेविरुद्ध विविध ठिकाणी नेऊन बेकायदेशीररीत्या डांबून ठेवल्याचेही तपासात समोर आले असल्याचे मंगेश साळवे यांनी सांगितले.

---------------------------------------

जखमींना उपचारासाठी हलविण्याची व्यवस्था केली. दरम्यान, या अपघातामुळे पुलावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. अपघाताची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेतली असून अपघाताच्या नेमक्या कारणांचा तपास सुरु आहे. भरधाव वेग, निष्काळजीपणा किंवा अन्य कोणत्या कारणामुळे हा अपघात झाला याबाबत अधिक तपशील तपासानंतरच स्पष्ट होणार आहे. शिंदेफना नदीवरील पुलावर यापूर्वीही अपघाताच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे या ठिकाणी वाहतूक नियंत्रण आणि सुरक्षेच्या उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

------------------------------------------

सुटण्याची शक्यता वाढली आहे. विशेषतः पावसाळ्यात चिखल आणि निसरड्या परिस्थितीमुळे दुचाकी वाहनचालकांना मोठा धोका निर्माण होत असून, चारचाकी वाहनांनाही अडचणींचा सामना करावा लागत आहे.या मार्गावरुन दररोज विद्यार्थी, शेतकरी, नोकरदार, रुग्णवाहिका तसेच इतर वाहनांची मोठ्या प्रमाणावर ये-जा होत असल्याने कोणत्याही क्षणी गंभीर अपघात होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने रस्त्याच्या दोन्ही बाजूंना तातडीने साईड पट्ट्या भरुन मार्ग सुरक्षित करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

सत्यप्रेम कोरडे, चिंतामणी कोळसे, हनुमान कोरडे, रंगनाथ सागर आणि रोहन डाके यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन सादर करून तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली. वेळेत उपाययोजना न केल्यास भविष्यात घडणाऱ्या अपघातांची जबाबदारी संबंधित विभागाची राहील, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.

------------------------------------------

त्यांनी देवेंद्र फडणवीस यांचे मनापासून अभिनंदन व आभार व्यक्त केले आहेत.या कायद्याचा सखोल अभ्यास करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीत नामांकित कायदेतज्ज्ञ आणि विचारवंतांचा समावेश आहे:अध्यक्ष: न्यायमूर्ती रंजना देसाईसदस्य: न्यायमूर्ती आर. सी. चव्हाण, न्यायमूर्ती एस. जी. मेहरे, डी. के. जैन, बिरेन्द्र सराफ, रमेश पतंगे आणि डॉ. सुवर्णा रावल."महाराष्ट्रात समान नागरी कायदा लागू होणारच, ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे! संविधानाने दिलेल्या समानतेच्या अधिकाराची ही खरी अंमलबजावणी असून, या क्रांतीकारी निर्णयासाठी मी भारताचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्रजी फडणवीस लोकनेत्या व कॅबिनेट मंत्री पंकजाताई मुंडे यांच्यासह महाराष्ट्र सरकारचे मनःपूर्वक अभिनंदन करतो आणि त्यांचे आभार मानतो."

— डॉ. प्रशांत पाटील (भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य)

---------------------------------------------

किंमत ₹10,000/-

- 50 लिटर तयार गावठी हातभट्टी दारू, किंमत ₹5,000/-असा एकूण ₹35,000/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

साहित्य जागीच नष्ट कारवाईदरम्यान पंचांसमक्ष आवश्यक सी.ए. नमुने घेण्यात आले. त्यानंतर हातभट्टी दारू तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे रसायन, ड्रम, कॅन व इतर साहित्य पंचांसमक्ष जागीच नष्ट करण्यात आले. पोलिसांची चाहूल लागताच मंदाबाई जाधव ही घटनास्थळावरुन फरार झाली.

गुन्हा दाखल, तपास सुरु

याप्रकरणी पोअं. आकाश अडागळे यांच्या फिर्यादीवरून मंदाबाई उत्तम जाधव हिच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम 65 (ई) (फ) अन्वये माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.

सदर कारवाई पोउपनि. सचिन शिंदे, पोहेकॉ. शिवनाथ उबाळे, पोअं. आकाश अडागळे व पोअं. किशोर खेत्रे यांनी पंचांच्या उपस्थितीत यशस्वीरित्या पार पाडली.

ग्रामीण भागात हातभट्टी दारूच्या विरोधात पोलीस प्रशासनाची कारवाई यापुढेही अशीच सुरु राहणार असल्याचे पोलीस निरीक्षकांनी सांगितले.

— माजलगाव ग्रामीण पोलीस ठाणे, जि. बीड

-----------------------------------------------

केज येथील व्यापारी हाजी मौला सौदागर यांच्या सौदागर ट्रेडिंग कंपनी या आडत दुकानात शेख शफिक शेख अतिक (वय 35, रा. धारूर) हा ऑक्टोबर 2022 पासून मुनीम म्हणून कार्यरत होता. धान्य खरेदी-विक्री, व्यवहाराची नोंद, बँकेत पैसे जमा करणे, धनादेशांची देवाण-घेवाण अशा सर्व आर्थिक व्यवहारांची जबाबदारी त्याच्याकडे होती. तीन वर्षांच्या कालावधीत त्याने प्रामाणिकपणे काम करत मालकाचा पूर्ण विश्वास संपादन केला होता. मात्र, हाच विश्वास त्याने फसवणुकीसाठी वापरल्याचा आरोप आहे. 17 जून रोजी हाजी मौला सौदागर हे पाठीच्या मणक्याच्या उपचारासाठी पत्नी व मुलासह राजस्थानातील जोधपूर येथे गेले होते. जाण्यापूर्वी त्यांनी आपल्या मुलगा जिशान याला देण्यासाठी चार धनादेशांवर स्वाक्षऱ्या करून ते कपाटात ठेवण्यास शफिक कडे दिले होते. याच धनादेशांचा गैरवापर करत शफिकने अनुक्रमे 8 लाख, 8 लाख, 10 लाख आणि 8 लाख, अशी एकूण 34 लाख रुपयांची रक्कम स्वतःच्या 'कोहिनूर स्टील' या नावाने असलेल्या बँक खात्यात जमा केली. त्यानंतर त्या खात्यातील काही रक्कम स्वतःच्या इतर खात्यांमध्ये तसेच आई-वडिलांच्या खात्यावर वर्ग केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.या प्रकरणात आणखी एक धक्कादायक बाब समोर आली आहे. शेख शफिक हा मैमुना खालेद शेख (रा. चेंबूर, मुंबई) यांच्या सौदागर ट्रेडर्स या अडत दुकानातही आर्थिक व्यवहार सांभाळत होता. तेथील 500 ते 600 पोती सोयाबीन परस्पर विकून 30 ते 40 लाख रुपयांची रक्कम घेऊन तो पसार झाल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी संबंधित व्यापाऱ्यांकडून स्वतंत्र कायदेशीर प्रक्रिया सुरु असल्याचे सांगितले जात आहे.या प्रकरणाला नाट्यमय वळण मिळाले ते 23 जून रोजी. शाहू को-ऑपरेटिव्ह बँकेच्या धारूर शाखेच्या व्यवस्थापकांनी हाजी मौला सौदागर यांना फोन करून, "तुमच्या खात्यातून चार धनादेशांद्वारे 34 लाख रुपये एका खात्यावर वर्ग झाले आहेत, हे व्यवहार तुम्हीच केले आहेत का?" अशी विचारणा केली. हा फोन येताच सौदागर यांना धक्काच बसला. उपचार आटोपून ते 27 जून रोजी केजला परतले. त्यांनी शफिकचा शोध घेतला असता तो केज आणि धारूर येथून फरार झाल्याचे समोर आले.

-----------------------------------------

यांचा विवाह बौद्धाचार्य एस. बी. मोरे सर यांच्या हस्ते आणि उपस्थितीमध्ये संपन्न झाला.या सोहळ्यात कोणत्याही प्रकारचा अनावश्यक खर्च न करता मोजक्या नातेवाईकांच्या उपस्थितीत वधू-वरांनी विवाहबंधनात अडकण्याचा निर्णय घेतल्याने त्यांच्या या निर्णयाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे. साध्या पद्धतीने विवाह सोहळा साजरा करून पौळ कुटुंबीयांनी समाजात एक चांगला संदेश दिला आहे.

-----------------------------------------

शोध घेण्यासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक 277/2026 भारतीय न्याय संहिता (बीएनएस) अंतर्गत गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादी श्रीपाद कृष्णाजी कुलकर्णी (रा. भूम) हे आपल्या कुटुंबासह चारचाकी वाहनातून जात असताना मांजरसुंबा घाट परिसरात आरोपींनी त्यांच्या वाहनाचा पाठलाग करून वाहन आडवे लावत त्यांना जबरदस्तीने थांबविले. त्यानंतर आरोपींनी कोयत्याचा धाक दाखवत फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांना मारहाण केली, जीवे मारण्याची धमकी दिली आणि सोन्याची अंगठी, रोख रक्कम व इतर मौल्यवान वस्तू लुटल्या. एवढ्यावरच न थांबता फिर्यादीचे एटीएम कार्ड ताब्यात घेऊन त्याचा पासवर्ड मिळविण्यात आला. त्यानंतर खात्यातून रोख रक्कम काढण्यात आली. मोबाईलवरील ऑनलाइन बँकिंग सुविधेचाही गैरवापर करून विविध व्यवहारांद्वारे रक्कम हस्तांतरित करण्यात आली. आरोपींनी फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांना इच्छेविरुद्ध विविध ठिकाणी नेऊन बेकायदेशीररीत्या डांबून ठेवल्याचेही तपासात समोर आले आहे.

----------------------------------------

या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी स्थानिक पातळीवर शालेय समितीच्या निवडी नुसार मुख्याध्यापक नियुक्ती पत्र कामगारांना देवुन पोषण आहाराचे नियंत्रण करतात. शा.पो.आ. कामगारांना दरमहा रुपये 2500/- म्हणजे दररोज केवळ 84 रुपये मानधनावर 4 ते 5 तास काम करावे लागते. किचन गृहाची साफ सफाई, पाणी आणणे व भरणे, भांडी कुंडी धुणे, तांदुळ, दाळी, किराणा साहित्य, भाजीपाला निवडणे, परिसर साफ करणे, मुलांना खिचडी वाटप करणे, पिण्याचे पाणी पुरवणे इत्यादी कामे करावी लागतात.काही शाळेत नियमित कामाव्यतिरिक्त इतर कामाची सक्ती करण्यासाठी दडपशाही केली जाते. कामगारांना काढुन टाकण्याची धमकी दिली जाते. अनेक वेळा गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे विविध समस्या बाबत मागणी करूनही दखल घेतली नाही. म्हणुन संघटनेच्या वतीने निवेदन देवुन दि.13 जुलै 2026 रोजी ग.शि. आ. कार्यालयावर धरणे आंदोलनाद्वारे हक्काच्या मागण्या मिळविण्याचा कामगारांनी निर्धार केल्याचे सोळंके अप्पा, आशा नानवटे, हनुमंत रुपनर, जयश्री मुंडे, चंद्रभागा फड, कविता कसबे, अंगद महाराज, सोमनाथ मुंडे, मिना मोगरे, शामराव जाधव, मिरा ढाकणे, मिना नागरगोजे, विमल फड, सविता गित्ते, शोभा बिडगर यांनी म्हटले आहे.

----------------------------------------

अरुण गुट्टे आणि कृषी विभागाच्या पथकाने संबंधित शेतांची पाहणी केली. प्राथमिक पाहणीत बियाण्यांच्या उगवण क्षमतेबाबत संशय व्यक्त करण्यात आला असून, संबंधित लॉटचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. साळेगाव येथील शेतकरी संदीपान टोपे यांनी आदिती कृषी सेवा केंद्रातून खरेदी केलेले बियाणे न उगवल्याने पुन्हा महाबीजच्या 612 वाणाची खरेदी केली. मात्र, दुसऱ्या पेरणीवेळीही काही बियाणे सडलेले व खराब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी खराब बियाणे वेगळे करून ठेवले असून, याबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार केली आहे. संदीपान टोपे यांनी सांगितले की, योग्य बीजप्रक्रिया करून पाच बॅग सोयाबीनची पेरणी केली होती. दहा दिवस उलटल्यानंतरही उगवण झाली नाही. पहिली व दुसरी पेरणी मिळून सुमारे 80 हजार रुपयांचा खर्च झाला असून, शासनाने नुकसानभरपाई द्यावी. या प्रकारामुळे संदीपान टोपे यांच्यासह सौरव वरपे, एकनाथ इंगळे, जयश्री टोपे, मुकेश गित्ते, कैलास पटणे, शफीक सय्यद आणि भागवत तिडके या शेतकऱ्यांचेही मोठे नुकसान झाल्याचे समोर - आले आहे. कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ प्रा. अरुण गुट्टे म्हणाले, - प्रत्यक्ष पाहणीत प्रथमदर्शनी बियाण्यांची उगवण क्षमता कमी असल्याचे दिसून येत आहे. संबंधित नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले असून, अहवालानंतर पुढील कार्यवाही केली जाईल. तालुका न कृषी अधिकारी सागर पठाडे यांनी सांगितले की, तालुक्यात आतापर्यंत सुमारे 70 हजार हेक्टरवर पेरणी झाली असून त्यापैकी 65 हजार हेक्टरवर सोयाबीन आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार न - उगवलेल्या सोयाबीन बियाण्यांचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

------------------------------------------

होता.या कार्यक्रमात फाउंडेशन तर्फे अध्यक्ष अँड श्री राजेश फड व सचिव इंजि. श्री ज्ञानदेव फड यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांमध्ये ऊर्जा निर्माण व्हावे असे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास फाउंडेशनचे अध्यक्ष अॅड. राजेश फड, उपाध्यक्ष आकाश फड, सचिव इंजि.ज्ञानदेव फड, सहसचिव श्री. नामदेव फड तसेच सदस्य सुधीर निरदुडे ,तुकाराम फड, इंजि. महादेव फड, रोहन क्षीरसागर, महेश पिंपळे, सभूदेव फड डॉ वैभव घोबळे,पत्रकार परमेश्वर वैध, ज्ञानदेव चाटे, गणेश हाके, शैलेश फड शुभम शिरसागर,अमोल फड आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच आदर्श विद्यालयचे मुख्याध्यापक गोविंद सोनपीर व लक्ष्मेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक गजानन शेटे, शिक्षकवृंद, पालक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमामध्ये गरजू व होतकरु विद्यार्थ्यांना बॅग,वह्या, पेन, पेन्सिल, कंपास पेटी व इतर आवश्यक शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देऊन त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवण्याचा आणि त्यांच्या शैक्षणिक प्रगतीस हातभार लावण्याचा संस्थेचा हा स्तुत्य उपक्रम असल्याचे उपस्थितांनी सांगितले...यावेळी बुद्धिमत्ता चाचणी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व बक्षीस देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करताना मान्यवरांनी त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व अधिक मेहनत घेऊन भविष्यात मोठे यश संपादन करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी न्यू संजीवनी फाउंडेशनच्या सामाजिक कार्याचे कौतुक करत, संस्थेने पूरग्रस्तांना मदत, रक्तदान शिबिरे, शैक्षणिक साहित्य वाटप यांसारख्या विविध समाजोपयोगी उपक्रमांद्वारे समाजात वेगळा आदर्श निर्माण केल्याचे नमूद केले.कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी फाउंडेशनचे सर्व पदाधिकारी, सदस्य, दोन्ही शाळांचे मुख्याध्यापक, व शिक्षकवृंद आणि सहकार्य करणाऱ्या सर्व दाते व हितचिंतकांचे आभार व्यक्त करण्यात आले.

------------------------------------------

पावसाने पुन्हा हजेरी लावताच शेतकऱ्यांनी पेरण्यांचा वेग वाढवत बहुतांश क्षेत्रावरील पेरणी पूर्ण केली. तालुक्यात सोयाबीनबरोबरच मूग, उडीद, तूर आणि मका या पिकांचाही पेरा झाला आहे. कापूस पिकाची मात्र केवळ 1 हजार 943 हेक्टर क्षेत्रावर लागवड करण्यात आली आहे. जूनच्या पहिल्या आठवड्यात पेरणी झालेली सोयाबीन व इतर पिके चांगली उगवून आली असून, पंधरा दिवस पावसाचा खंड पडल्याने अनेक शेतकऱ्यांनी उपलब्ध पाण्याच्या साहाय्याने पिके टिकवून ठेवली. जूनच्या शेवटच्या आठवड्यात पेरणी झालेली पिकेही आता उगवून आली आहेत. सध्या तालुक्यात ढगाळ वातावरण असले तरी समाधानकारक पाऊस होत नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत. विशेषतः सोयाबीन हे तालुक्यातील प्रमुख पीक असल्याने त्याच्या वाढीसाठी आगामी काळात चांगल्या पावसाची आवश्यकता असून, शेतकऱ्यांचे लक्ष आता आकाशाकडे लागले आहे.

----------------------------------



परळी संघर्षनेता
समता,बंधुता,न्याय अधिकारांचा नेता...
✦ सत्याचा पाठपुरावा... जनतेचा विश्वास... ✦
वाचा आता एका क्लिक वर
https://www.parlisangharshneta.in
9881265102
हॅलो बीड
परळी संघर्षनेता
रविवार दि. 12 जुलै 2026


# वारकऱ्यांवर दरोडेखोरांचा हल्ला; दिंडी चालकाची 70 हजारांची लूट

फलटण (जि. सातारा) : विठूरायाचे दर्शन घेऊन पंढरपूरहून आळंदीच्या दिशेने निघालेल्या बीड जिल्ह्यातील वडवणी येथील वारकऱ्यांच्या दिंडीवर फलटण तालुक्यातील वडजलजवळ हल्ला करण्यात आला. यामध्ये दिंडीचालकाला मारहाण करण्यात आली. ही धक्कादायक घटना पुणे-पंढरपूर महामार्गावरील वडजलजवळील काशीदवाडी फाट्याच्या परिसरात 5 जुलैच्या मध्यरात्री घडली होती. या हल्ल्यात दिंडीचालक त्रिंबक कोळेकर यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला असून, त्यांच्या डोळ्याला गंभीर दुखापत झाली आहे.



वडवणी (जि. बीड) येथील वारकरी दिंडी पंढरपूरहून आळंदीकडे प्रवास करत असताना काशीदवाडी फाट्याजवळील एका पत्र्याच्या शेडमध्ये विश्रांती व जेवणासाठी थांबली होती. यावेळी काही अज्ञात व्यक्तींनी दिंडीवर दगडफेक केली. दिंडीचालक त्रिंबक कोळेकर यांना मारहाण केली; तसेच सुमारे 70 हजार रुपयांची रोकड लुटल्याचा आरोप वारकऱ्यांनी केला आहे.या घटनेनंतर रात्री उशिरा पोलिस घटनास्थळी पोहोचले होते. मात्र, वारकऱ्यांच्या म्हणण्यानुसार या प्रकरणात कोणताही गुन्हा नोंदवला नाही. उलट, 'इथून निघून जा, गाडीची हवा सोडली असती तर काय झाले असते?' अशा प्रकारची भीती दाखवण्यात आल्याचा गंभीर आरोप वारकऱ्यांकडून करण्यात आला आहे.

पान 3 वर

## बसस्थानक परिसरात महिलांना बोलण्यात गुंतवून हातचलाखीने दागिने चोरी

### दोन महिला जेरबंद, नेकनुर पोलिसांची कारवाई



नेकनुर : येथील बसस्थानक परिसरात एकट्या महिलांना लक्ष्य करून हातचलाखीने दागिने चोरी करणाऱ्या दोन महिला आरोपींना अटक करण्यात आली. नेकनूर पोलिसांना यश आले असून त्यांच्याकडून काही गुन्हे उघडकीस येतील असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला. नेकनूर बसस्थानक परिसरात 6 जुलै रोजी एका महिलेच्या पिशवीतील अंदाजे 77 हजार 400 रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने अज्ञात महिलांनी चोरून नेले. या प्रकरणी नेकनूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी तपासाची चक्र फिरवत घटनास्थळावरील CCTV फुटेज, तांत्रिक विश्लेषण, गोपनीय बातमीदारांकडून प्राप्त माहिती तसेच इतर उपलब्ध पुराव्यांच्या आधारे आरोपींचा शोध घेतला. सोजर सूरज भोसले (वय 35 वर्षे, रा. पारनेर, ता. पाटोदा, जि. बीड),

पान 3 वर

## मांजरसुंबा घाटात थरारक दरोडा

### लूट करणारे दोन आरोपी नेकनूर पोलिसांनी केले जेरबंद; चार दिवसांची पोलिस कोठडी



नेकनूर : मांजरसुंबा घाट परिसरात कुटुंबासह प्रवास करणाऱ्या व्यक्तीला अडवून कोयत्याचा धाक दाखवत दरोडा टाकणे, अपहरण करून विविध ठिकाणी बेकायदेशीररीत्या डांबून ठेवणे तसेच एटीएम व ऑनलाइन बँकिंगचा गैरवापर करून सुमारे 1 लाख 80 हजार रुपयांचा ऐवज लुटणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात नेकनूर पोलिसांना यश आले आहे.

या प्रकरणातील दोन आरोपींना अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. उर्वरित आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके

पान 3 वर

## शिंदेफना नदीवरील पुलावर भीषण अपघात; क्रेटाच्या धडकेत बैल गंभीर जखमी, चालकांसह तिघे जखमी



माजलगाव : शहरातील शिंदेफना नदीवरील पुलावर सोमवारी एक भीषण अपघात घडला. भरधाव वेगाने येणाऱ्या क्रेटा कारने बैलगाडीला जोरदार धडक दिल्याने या अपघातात बैल गंभीर जखमी झाले. क्रेटा कारचालक आणि बैलगाडी चालकही जखमी झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, क्रेटा कार आणि बैलगाडीची धडक इतकी जोरदार होती की, धडकेच्या तीव्रतेमुळे बैल अक्षरशः बाजूला लावण्यात आलेल्या बॅरिकेट्सच्या पलीकडे फेकला गेला. या घटनेनंतर पुलावर काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अपघातातील क्रेटा कार नांदेड येथील असल्याचे, तर बैलगाडी माजलगाव येथील असल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे. अपघातानंतर घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी झाली. स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतकार्य करत

पान 3 वर

## अपघाताची वाट न पाहता रस्ता सुरक्षित करा; सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नागरिकांची मागणी

● पात्रुड–जीवनापूर मार्गावरील साईड पट्ट्या तातडीने भरण्यासाठी निवेदन; पावसाळ्यात वाढला अपघाताचा धोका



माजलगाव | अनंत घडसिंगे

पात्रुड–जीवनापूर मार्गावरील रस्त्याच्या दोन्ही बाजूंना साईड पट्ट्या न भरल्याने वाहनचालकांच्या जीवितास धोका निर्माण झाला असून, पावसाळ्यात ही परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. त्यामुळे अपघात होण्यापूर्वीच संबंधित रस्ता सुरक्षित करण्यासाठी तातडीने साईड पट्ट्या भराव्यात, अशी मागणी नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, रस्त्याच्या दोन्ही बाजूंना भराव नसल्याने रस्ता आणि बाजूच्या जमिनीमध्ये उंचीचा मोठा फरक निर्माण झाला आहे. त्यामुळे वाहन रस्त्याच्या कडेला गेल्यास चालकांचे नियंत्रण

पान 3 वर

## धर्म वेगवेगळा असला तरी कायदा एकच!' महाराष्ट्रात समान नागरी कायद्याच्या दिशेने ऐतिहासिक पाऊल;

» डॉ. प्रशांत पाटील यांच्याकडून देवेंद्रजी फडणवीस यांचे मन:पूर्वक अभिनंदन!



माजलगाव [ अनंत घडसिंगे ] :

धर्म कोणताही असला तरी कायदा सर्वांसाठी एकच असेल. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानातील समानतेच्या तत्त्वाला बळ देण्यासाठी महाराष्ट्र सरकारने मोठे पाऊल उचलले आहे," अशी ऐतिहासिक घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली. महाराष्ट्रात समान नागरी कायदा (UCC) लागू करण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने आता अधिकृतपणे एका उच्चस्तरीय अभ्यास समितीची नियुक्ती केली आहे.

सरकारच्या या धाडसी आणि दूरगामी निर्णयाचे भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ. प्रशांत



पाटील यांनी जाहीर स्वागत केले असून, या ऐतिहासिक पावलासाठी

पान 3 वर

## माजलगाव ग्रामीण पोलिसांची कारवाई; हातभट्टी दारूसाठी लागणारे 650 लिटर रसायन व 50 लिटर दारू जप्त, महिला फरार



माजलगाव | प्रतिनिधी | माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पथकाने गावठी हातभट्टी दारूच्या विरोधात मोठी कारवाई केली आहे. किट्टीआडगाव येथे गुप्त माहितीच्या आधारे टाकलेल्या छाप्यात हातभट्टी दारु तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे 650 लिटर रसायन आणि 50 लिटर तयार दारु जप्त करण्यात आली. कारवाईदरम्यान आरोपी महिला मात्र पोलिसांना चकवा देऊन फरार झाली आहे.

कशी झाली कारवाई

उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत्रे व पोलीस निरीक्षक श्री. रामोड यांच्या मार्गदर्शनाखाली माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पथकाने दि. 10/07/2026 रोजी किट्टीआडगाव, ता. माजलगाव, जि. बीड येथे छापा टाकला.

या कारवाईत मंदाबाई उत्तम जाधव (रा. किट्टीआडगाव, ता. माजलगाव) हिच्या ताब्यातून खालील मुद्देमाल हस्तगत करण्यात आला:

- 200 लिटर क्षमतेचे 2 प्लास्टिक ड्रम: एकूण 400 लिटर रसायन, किंमत ₹20,000/-
- 200 लिटर क्षमतेचा 1 लोखंडी ड्रम: 200 लिटर रसायन,

पान 3 वर

## मुनीमाने लावला मालकाला 34 लाखांचा चुना!




केज : ज्याच्यावर व्यवहाराचा विश्वास ठेवला, त्यानेच तिजोरीवर डल्ला मारला..." अशीच संतप्त प्रतिक्रिया केज येथील व्यापारी वर्गातून उमटत आहे. केज येथील एका आडत दुकानात गेल्या तीन वर्षांपासून विश्वासाने काम करणाऱ्या मुनीमाने मालक उपचारासाठी बाहेरगावी गेल्याची संधी साधत सह्या करून ठेवलेल्या धनादेशांचा गैरवापर करून तब्बल 34 लाख रुपये स्वतःच्या खात्यावर वळते केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एवढ्यावरच न थांबता, त्याने दुसऱ्या व्यापाऱ्याच्याही लाखो रुपयांच्या सोयाबीनची परस्पर विक्री करून रक्कम घेऊन पसार झाल्याची माहिती समोर आल्याने केजची व्यापारी पेठ हादरली आहे.

पान 3 वर

## अनावश्यक खर्च टाळून साधेपणाने पार पडला विवाह

### साक्षगंधातच उरकला मंगल परिणय



माजलगाव | अनंत घडसिंगे

वंचित बहुजन आघाडीचे माजलगाव तालुकाध्यक्ष अशोक पौळ यांनी आपल्या कन्येच्या विवाहात एक नवा आदर्श घालून दिला आहे. अनावश्यक खर्च आणि बडेजाव टाळून त्यांनी आपल्या कन्येचा विवाह सोहळा अत्यंत साधेपणाने साक्षगंधाच्या दिवशीच पार पाडला.

निपाणी टाकळी ता.माजलगाव येथील अशोक पौळ यांच्या निवासस्थानी हा मंगल परिणय सोहळा पार पडला. त्यांची कन्या कु. नंदिनी अशोक पौळ आणि संभाजीनगर येथील ऋषिकेश सुरेश पट्टेकर

पान 3 वर

## मांजरसुंबा घाटातील थरारक दरोडा प्रकरण उघड; नेकनूर पोलिसांची धडाकेबाज कारवाई !

» अपहरण, दरोडा व ऑनलाइन बँकिंगद्वारे लूट करणारे दोन आरोपी जेरबंद !




केज प्रतिनिधी/ रोहन गलांडे केज अंबाजोगाई मतदार संघातील मांजरसुंबा घाट परिसरात कुटुंबासह प्रवास करणाऱ्या व्यक्तीला अडवून कोयत्याचा धाक दाखवत दरोडा टाकणे, अपहरण करून विविध ठिकाणी बेकायदेशीररीत्या डांबून ठेवणे तसेच एटीएम व ऑनलाइन बँकिंगचा गैरवापर करून सुमारे 1 लाख 80 हजार रुपयांचा ऐवज लुटणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात नेकनूर पोलिसांना मोठे यश आले आहे. या प्रकरणातील दोन आरोपींना अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. उर्वरित आरोपींचा

पान 3 वर

## शा.पो. कामगारांच्या न्याय्य मागण्यासाठी गटशिक्षणाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन

● शालेय पोषण आहार बंद ठेवुन आंदोलनात सामील व्हा–विजयकुमार अप्पा सोळंके


परळी (प्रतिनिधी) तालुक्यातील जि.प.शाळा व खाजगी संस्थेतील शाळेतील शालेय पोषण आहार कामगारांचे परळी गटशिक्षणाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन राज्य सरचिटणीस डॉ. अशोक थोरात यांच्या निर्देशानुसार जिल्हाध्यक्ष कॉ. प्रभाकर नागरगोजे यांच्या नेतृत्वात कामगारांच्या विविध प्रलंबीत न्याय्य मागणीसाठी शाळेतील पोषण आहाराचे काम बंद ठेवुन गटशिक्षणाधिकारी कार्यालयावर आंदोलन करणार असल्याचे तालुकाध्यक्ष रमेश पांचाळ, कोषाध्यक्षा सुमित्रा सावंत यांनी पत्रकात नमुद केले आहे.

परळी तालुक्यातील सर्व जि. प. शाळा तसेच खाजगी संस्थेतील शा.पो.आ.चे काम करणारे काम बंद ठेवुन आंदोलनात सहभागी होणार आहेत. गटशिक्षणाधिकारी यांच्या अधिकारातील योग्य व न्याय्य मागण्या मंजुर करून घेण्यासाठी धरणे आंदोलन आयोजित केले आहे.

केंद्र व राज्य सरकारच्या संयुक्त सहभागातुन शाळेतील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मध्याण्ह भोजन दिले जाते. जि.प. शिक्षणाधिकारी व ग.शि. आ.

पान 3 वर

## केजमध्ये सोयाबीन बियाण्यांचा घोटाळा?; उगवण न झाल्याने शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट !



केज प्रतिनिधी/ रोहन गलांडे केज तालुक्यात कमी पावसाच्या संकटात यंदा निकृष्ट सोयाबीन बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचा प्रकार सनोर आला आहे. पेरणीनंतरही बियाण्यांची उगवण न झाल्याने अनेक शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ आली असून,काही ठिकाणी खरेदी केलेल्या बियाण्यांच्या पिशव्यांमध्ये सडलेले व खराब बियाणे आढळल्याने संताप व्यक्त केला जात आहे. तालुक्यात यंदा सुमारे 70 हजार हेक्टर क्षेत्रावर खरीप पेरणी झाली असून, त्यापैकी 65 हजार हेक्टरवर सोयाबीनची लागवड करण्यात आली आहे. साळेगाव, नांदुरघाट, युसुफवडगाव, बनसारोळा, तांबवा आणि मांगवडगाव चिंचोली माळी,परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी महाबोज तसेच जे. एस. कंपनीचे सोयाबीन बियाणे खरेदी करून पेरणी केली होती. मात्र, अपेक्षित उगवण न झाल्याने शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडे तक्रारी दाखल केल्या. तक्रारींची दखल घेत उपविभागीय कृषी अधिकारी राहुल गायकवाड, कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ प्रा.

पान 3 वर

## घाटनांदुर येथे न्यू संजीवनी फाउंडेशनतर्फे गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप व गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान संपन्न



घाटनांदुर प्रतिनिधी :– येथे न्यू संजीवनी फाउंडेशन, धर्मापुरी यांच्या वतीने दि.11 जुलै शनिवार रोजी दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सामाजिक बांधिलकी जपत घाटनांदुर येथील आदर्श विद्यालय व लक्ष्मेश्वर विद्यालय येथील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप तसेच बुद्धिमत्ता चाचणी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

गेल्या सात वर्षांपासून न्यू संजीवनी फाउंडेशन, धर्मापुरी हे सामाजिक, शैक्षणिक आणि मानवतावादी क्षेत्रात विविध उपक्रम राबवत असून समाजातील गरजू, होतकरू आणि एकल पालकांच्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याचे कार्य सातत्याने करत आहे. त्याच सामाजिक उपक्रमाचा एक भाग म्हणून आज हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला

पान 3 वर

## केज तालुक्यात ६९ हजार ८१३ हेक्टरवर खरीप पेरणी !



केज प्रतिनिधी/ रोहन गलांडे यंदाच्या खरीप हंगामात केज तालुक्यात 69 हजार 813 हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली असून त्यामध्ये सर्वाधिक 64 हजार 215 हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनची लागवड करण्यात आली आहे. जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सलग तीन दिवस झालेल्या समाधानकारक पावसामुळे पेरणीला वेग आला, तर 20 जूननंतर पुन्हा झालेल्या पावसामुळे उर्वरित पेरण्या पूर्ण झाल्या. मे महिन्याच्या अखेरीपासून शेतकऱ्यांनी खरीप हंगामाच्या तयारीला सुरुवात केली होती. जूनच्या सुरुवातीला झालेल्या पावसामुळे सोयाबीनसह विविध पिकांची पेरणी सुरु झाली. त्यानंतर जवळपास पंधरा दिवस पावसाने दडी मारल्याने पेरणीचे काम ठप्प झाले होते. मात्र 20 जूननंतर

पान 3 वर